# विपश्यना

**साधकांचे मासिक प्रेरणा पत्र**

**बुद्धवर्ष** २५५६, **मार्गशीर्ष पौर्णिमा,** २८ **डिसेंबर,** २०१२ **वर्ष** १ **अंक** १०

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः – http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धम्मवाणी**

**“चरथ, भिक्खवे, चारिकं बहुजनहिताय बहुजनसुखाय लोकानुकम्पाय अत्थाय हिताय सुखाय देवमनुस्सानं; देसेथ, भिक्खवे, धम्मं आदिकल्याणं मज्झेकल्याणं परियोसानकल्याणं।”**

(दी. नि. २.३५-३६)

“भिक्षूंनो, अनेकांच्या हितासाठी, अनेकांच्या सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, देवता आणि मनुष्यांच्या हेतूसाठी, हितासाठी, सुखासाठी विचरण करा. सुरवातीस कल्याणकारक, मध्यात कल्याणकारक, अंती कल्याणकारक धर्माचा उपदेश करा.

## बाह्य वेषभूषेमुळे श्रमण नाही

एकदा भगवान श्रावस्तीच्या पूर्वारामात विहार करीत होते. तेथे महाराज प्रसेनजितही आले. थोड्या वेळानंतर काही जटा-धारी, भस्म-विभूती फासलेले व नग्न साधू-संन्याशी विभिन्न प्रकारच्या वेषभूषेत त्यांच्या समोरून गेले. महाराज प्रसेनजितने उठून त्यांना अभिवादन केले आणि आपला परिचय दिला. आशिर्वाद देऊन ते आपल्या रस्त्याने निघून गेले. त्यानंतर प्रसेनजितने भगवानांना म्हटले –

“भगवान! जे लोकात अरहंत आहेत अथवा अरहंत मार्गावर आरूढ आहेत, हे साधूही त्यापैकीच आहेत.” भगवानांनी त्यांची दशा पाहून म्हटले –

“नाही महाराज! केवळ वेष बदलण्यामुळे कोणी व्यक्ती अरहंत अथवा अरहंत मार्गावर आरूढ होत नाही. त्यासाठी त्याला सम्यक प्रकारे प्रयत्न करावे लागतात. कोणाला सम्यक मार्ग मिळाल्यानंतरही तो योग्यप्रकारे त्या मार्गावर चालत आहे की नाही, हे जाणण्यासाठी एखाद्या समजदार व्यक्तीला दिर्घकाळापर्यंत त्याच्या संपर्कात राहणे आवश्यक आहे. थोड्या वेळात त्याच्या वागणूकीबाबत योग्य माहिती मिळू शकत नाही. महाराज! कोणाच्या व्यवहारानेच त्याच्या इमानदारी अथवा बेइमानीची माहिती होऊ शकते. ते ही दिर्घकाळापर्यंत त्याच्या दैनिक क्रियांवर लक्ष ठेवल्यावरच.

“कोणी प्रज्ञावान पुरुषच त्याच्या व्यवहारांवर योग्य प्रकारे लक्ष ठेऊ शकतो, सगळेच नाहीत. विपत्ती आल्यावरच मनुष्याच्या मनाच्या स्थिरतेची माहिती होते. ह्याचप्रकारे दीर्घकाळापर्यंत चर्चा केल्यावरच त्याच्या प्रज्ञेची माहिती होते.”

ह्या व्याख्येमुळे महाराज प्रसेनजित खूप प्रभावित झाले आणि साश्चर्य क्षमायाचना करीत त्यांनी स्वतःच सत्य प्रकट करीत म्हटले–

“भगवान! हे सर्व माझे गुप्तचर आहेत आणि वेष बदलून आंतरिक व शेजारी राज्यांच्या गतिविधींचा भेद घेतात आणि मला सूचित करीत राहातात. त्यानुसार विचार करून मी आवश्यक कार्यवाही करतो. भंते भगवान! आता हे लोक भस्म-विभूती धूवून, स्नान करून, विलेपन लावून, स्वच्छ कपडे घालून पाच कामगुणांचा भोग घेतील.”

ह्यावर भगवानांनी समजाविले –

“केवळ वरील वेषभूषेमुळे मनुष्याला जाणू शकत नाही. केवळ बाहेरील वेष पाहून कोणावर विश्वासस करू नये. मोठे संयमित व आकर्षक कार्य करीतही दुष्टजन विचरण करीत असतात. माती वा लोखंडावर सोन्याचे पानी चढविलेले नकली कुंडल सुद्धा आकर्षक दिसते. असेच चमकदार वेष बनवून विचरण करणारे आतून घाणेरडे आणि बाहेरून चमकदार दिसून येतात. त्यामुळे जाणल्याविना, समजल्याविना एखाद्या बाह्य दिखाव्याच्या आधारावर कधीही विश्वास करू नका. त्यांच्या आचरणाला जाणून-समजूनच विश्वास केला पाहिजे.”

**योग्य श्रमण**

एकदा भगवान अंग देश (ओरिसा) च्या अश्वपूर गावात विहार करीत होते. तेथे भगवानांनी भिक्षूंना संबोधित करीत म्हटले –

“भिक्षूंनो! ‘श्रमण’ ‘श्रमण’ म्हणून लोक एखाद्याला बोलावतात आणि विचारल्यावर ही तो स्वतःला ‘श्रमण’ म्हणतो. अशी संज्ञा आणि असा दावा करणाऱ्या लोकांना श्रमणतेचा जो मार्ग आहे त्याला सिद्ध करावे लागते की तो खऱ्या अर्थाने त्या मार्गावर आरूढ आहे. त्यासाठीच लोक त्यांना चीवर, भिक्षा, निवास, औषध व अन्य उपयोगी वस्तूंचे दान देतात. त्यांचे दिलेले दान तेव्हाच सफल होते जेव्हा ‘श्रमण’ ची प्रव्रज्या निर्मल, सदाचरणयुक्त आणि लोकांच्या कल्याणात सहायक होते.

“भिक्षूंनो! कोणी श्रमण-मार्गावर कसा आरूढ होऊ शकत नाही? ज्या भिक्षूचा जेव्हापर्यंत लोभ नष्ट होत नाही, असेच क्रोधीचा क्रोध, वैऱ्याचे वैर, निष्ठुराची निष्ठुरता, ईर्ष्याळूची ईर्ष्या, कंजूसाची कंजूसी, धूर्ताची धूर्तता, पापीची पापेच्छा, मिथ्यादृष्टी वाल्याची मिथ्यादृष्टी इत्यादी नष्ट होत नाहीत तेव्हापर्यंत तो योग्य भिक्षू होऊ शकत नाही. हे सर्व त्याच्यासाठी श्रमणाचे मळ आहेत, मार्गाच्या बाधा आहेत, अपायगतीकडे नेणारे आहेत. अशा भिक्षूंच्या प्रव्रज्येला मी दुधारी अवजारांची प्रतिमा देतो, ज्याला कोणी चीवरात लपवून ठेवेल तर ते चीवरालाच कापेल. ह्या मळांनीयुक्त कोणी व्यक्ती जरी चीवरधारी असो, वस्त्ररहित (नग्न) असो, अंगाचा चिखल फासलेला असो. भस्म लावलेला

असो, पाण्यात रहाणारा असो, झाडाखाली राहणारा असो, झाडाची साल घालनारा असो, खुल्या मैदानात राहणारा असो, नेहमी उभा राहणारा असो, मध्ये-मध्ये निराहार राहून भोजन करणारा असो, वेद-पाठी असो, मंत्रांचे अध्ययन करणारा असो – ह्यापैकी कोणालाही मी श्रमण म्हणत नाही.

योग्य श्रमण तेव्हाच होईल जेव्हा वरील चित्ताच्या मळांचा त्याग करेल. ह्या चित्ताच्या मळांना दूर करण्यासाठी निरंतर चित्त-शुद्धीच्या मार्गाचा अभ्यास करीत असेल आणि विकारांपासून मुक्त होऊन योग्य श्रमणाचे जीवन जगू लागेल.

भिक्षूंनो! कोणी श्रमण योग्य मार्गावर कसा आरूढ होतो?

ज्या भिक्षूंची मिथ्यादृष्टी नष्ट होते, जो क्रोध, लोभ, वैर इत्यादी सर्व चित्ताच्या मळांपासून मुक्त होतो, तोच योग्य मार्गावर आरूढ मानला जातो. तेव्हाच तो स्वतःला विशुद्ध, विमुक्त झालेला म्हणू शकतो. ह्या प्रकारच्या चित्ताच्या मळांपासून विमुक्त झालेल्या भिक्षूच्या मनात प्रसन्नता उत्पन्न होते. प्रसन्न चित्तामुळे प्रीती उत्पन्न होते. प्रीतियुक्त पुरुषाची काया स्थिर होते. तो स्थिर शरीर सुखाचा अनुभव करतो. ह्या प्रकारे सुखी चित्त समाहित (एकाग्र) होते. तो मैत्रीयुक्त चित्ताने एका दिशेला भारून टाकून विहरतो. त्यानंतर दुसरी दिशा, तीसरी दिशा, चौथी दिशा, वरची व खालची दिशा म्हणजे सर्व दिशांना मैत्रीचित्ताने भारून टाकून, सर्व प्राण्यांच्या प्रती द्वेषरहित होऊन अपरिमित मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षायुक्त चित्ताने विहार करतो. सर्वांना सुख पोहोचवितो, सर्वांच्या कल्याणात सहायक होतो. ह्या प्रकारे त्याचे श्रमण म्हणविले जाणे सार्थक झाले असे मानले जाते.

जसे भिक्षूंनो! एखादा स्वच्छ, शीतल, मधुर जलयुक्त सुंदर घाट असणारा तलाव असेल आणि पूर्व दिशेच्या कडक उन्हामुळे संतप्त, तृषित कोणी पुरुष येऊन त्या तलावात उतरून आपली तहान दूर करतो, उन्हाच्या तापाला दूर करतो. ह्याचप्रकारे पश्चिम दिशेने येऊन, उत्तर दिशेने व दक्षिण दिशेने येऊन आपली तहान भागवितात, उन्हाचा ताप दूर करतात. असेच भिक्षूंनो! कोणी क्षत्रिय-कुळातून बेघर होऊन प्रव्रजित होतो, व तो तथागतांच्या उपदेशित धर्माला प्राप्त करून मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षाची भावना करून आध्यात्मिक शांती प्राप्त करतो. तो आध्यात्मिक शांती प्राप्त श्रमण योग्य मार्गावर आरूढ आहे. ह्याच प्रकारे ब्राम्हण-कुळातून, वैश्य-कुळातून अथवा शूद्र-कुळातून बेघर होऊन, प्रव्रजित होतात आणि तथागतांच्या उपदेशानुसार चालून म्हणजे विपश्यना भावनेचा अभ्यास करून मैत्री, करुणा, मुदिता उपेक्षाची भावना करतात, तर खऱ्या श्रमणत्वाचे भागीदार बनतात. ते सर्व आस्त्रवांपासून, चित्ताच्या मळांपासून रहित होऊन चित्त-विमुक्ती, प्रज्ञा-विमुक्तीला ह्याच जीवनात स्वतः जाणून, साक्षात करून विहार करतात.

वस्तुतः आस्त्रवांच्या क्षयानेच योग्य श्रमण होतो. मग तो कोणत्याही कुळातून आलेला असो. जात त्याचा मार्गात बाधक होऊ शकत नाही.

या साधकांनो! आम्हीही धर्ममार्गावर पाऊल-पाऊल चालत सर्व प्रकारच्या चित्ताच्या मळांपासून मुक्त होऊन आपले मंगल साधू, आपले कल्याण साधू!

कल्याणमित्र
सत्यनारायण गोयन्का

---

## केंद्रीय व समन्वयक आचार्यांना संबोधन

**माझ्या प्रिय धर्मपुत्रांनो आणि धर्मपुत्रींनो!**

तुम्हा सर्वांप्रती माझ्या मंगल कामना!

आपल्या गुरुदेवांच्या इच्छेनुसार विपश्यना शिकवित मला आज ५० पेक्षाही जास्त वर्ष झाली आहेत. मी पूर्वी म्यंमामध्ये आणि नंतर १९६९ पासून भारतात धर्म शिकविला. सयाजींनी मला धर्माचे गंभीर प्रशिक्षण दिले आणि जसे की तुम्ही सर्व जाणता, त्यांच्या प्रबळ इच्छेनुसार मी तुम्हा सर्वांच्या सहकार्याने विपश्यनेला भारतात व समस्त विश्वात पुनः प्रतिष्ठापित करू शकलो. आम्ही सर्व सयाजींच्या स्वप्नांना साकार करण्यात आणि द्वितीय बुद्धशासनाला यथाशक्ती सहकार्य करण्यात सफल झालो.

मला आजही तो दिवस लक्षात आहे जेव्हा सयाजी म्हणाले होते – "गोयन्का, भारतात तु जात नाही आहेस, म्यंमावर भारताचे जे ऋण आहे त्याला फेडण्याकरीता मी जात आहे. तुझ्यासोबत धर्म जात आहे." त्यांनी माझ्यावर कोणतीही परामर्शक समिती बसविली नव्हती. केवळ धर्माची सखोल समज आणि आपल्या गहन निर्देशांसह पाठविले, ज्यांचे मी पूर्ण निष्ठेने पालन केले. जेव्हा-जेव्हा आवश्यकता वाटली, मी त्यांच्या सल्ला घेतला. परंतु भारतात आल्यावर सुरवातीच्या तीन वर्षांपर्यंतच मला त्यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाचा लाभ मिळाला, तरी त्यांच्या मृत्युनंतरही त्यांचे आशिर्वाद मला आज ही प्राप्त आहेत.

मी ५० पेक्षा जास्त वर्षांपासून स्वतंत्र रूपाने आपल्या आचार्यांद्वारे दिल्या गेलेल्या निर्देशानुसार धर्माची सेवा करीत आहे. मी इच्छितो की आता तुम्ही सर्वच माझ्याप्रमाणे समान सामर्थ्य आणि उत्तरदायित्वासह धर्माच्या शुद्धतेला कायम ठेवीत धर्माची सेवा करा! विश्वातील लोकांच्या भल्यासाठी धर्माचा जास्तीतजास्त प्रचार-प्रसार करा. आता तुम्ही स्वावलंबी आहात. जेव्हापर्यंत माझे प्राण आहेत, तुम्ही मला आवश्यकतेनुसार सल्ला विचारू शकता. त्याच्या नंतरही माझे आशिर्वाद तर सदैव तुमच्यासोबत राहतीलच.

धर्माचा प्रचार-प्रसार साऱ्या विश्वात झाला आहे, म्हणून मी केंद्रानुसार व क्षेत्रानुसार उत्तरदायित्व सोपवीत आहे. प्रत्येक केंद्राच्या धर्म-कार्याच्या देखरेखीसाठी केंद्रीय आचार्याला नियुक्त केले आहे. ह्या केंद्रीय आचार्यांच्या यथावश्यक सहायतेसाठी व आपापल्या क्षेत्रात धर्माचा प्रचार-प्रसारासाठी समन्वयक क्षेत्रीय आचार्यांची नियुक्ती केली आहे.

येथे एक सूची संलग्न आहे ज्यामध्ये विश्वभरातील केंद्रीय व समन्वयक क्षेत्रीय आचार्यांचे नाव व त्यांचे उत्तरदायित्व परिभाषित केले गेले आहे. नवनिर्मित विश्वव्यापी संगठनासाठी बनविले गेलेले काही निर्देशही संलग्न आहेत.

आता आपण स्वावलंबी आहात. तथापी आपल्या वरिष्ठांच्या प्रती तुमच्या मनात आदर आणि सन्मानाचा भाव अवश्य असावा. केंद्रीय आचार्य आपापल्या केंद्राचे प्रभारी राहतील आणि समन्वयक क्षेत्रीय आचार्य आपल्या गहन आणि विस्तृत अनुभवाच्या आधारे आवश्यकतेनुसार त्यांची सहायता करतील, त्यांचे मार्गदर्शन करतील. मुख्य जबाबदारीच्या रूपात ते आपापल्या क्षेत्रात धर्माचा प्रचार-प्रसार करतील.

माझी ही सुद्धा इच्छा आहे की तुमच्यापैकी ज्यांनी ४५ किंवा ६० दिवसीय शिबिरात भाग घेतला नाही, त्यांनी आपल्या

सोयीनुसार यथाशीघ्र त्यात सम्मिलित व्हावे.

धर्ममार्गावर प्रगती करण्यासाठी मी तुम्हा सर्वांना आपल्या मंगल कामना देतो. माझी भरपूर मैत्री नेहमी तुमच्यासोबत राहील.

मंगल मैत्रीसह
सत्यनारायण गोयन्का

---

## भारतातील विपश्यना केंद्र व केंद्रीय आचार्यांची सूची

### महाराष्ट्र

| विपश्यना केंद्र | केंद्रीय आचार्य |
|---|---|
| १. धम्म गिरि | श्री प्रेमजी एवं श्रीमती मधु सावला |
| २. धम्म तपोवन-१ व २ | श्री प्रेमजी एवं श्रीमती मधु सावला |
| ३. धम्म नाग | श्री सुधीर एवं श्रीमती माधुरी शाह |
| ४. धम्म सुगति | श्री विश्वंभर दहाट |
| ५. धम्म सरोवर | श्री प्रकाश महाजन |
| ६. धम्म आनन्द | डॉ. हमीर एवं डॉ. (श्रीमती) निर्मला गानला |
| ७. धम्म पुण्ण | डॉ. निखिल मेहता |
| ८. धम्म आलय | श्री प्रकाश एवं श्रीमती सुभांगी बोरसे |
| ९. धम्म सरिता | श्री श्याम सुंदर तापड़िया |
| १०. धम्म अजन्ता | श्री चंपालाल खींवसरा |
| ११. धम्म मनमोद | श्री अभिजीत पाटील |
| १२. धम्म नासिका | श्री अशोक एवं श्रीमती पुष्पा पवार |
| १३. धम्म वाहिनी | कु. प्रीति डेढ़िया |
| १४. धम्म विपुल | श्री अरुण तोषणीवाल |
| १५. धम्म पत्तन | श्री महासुख एवं श्रीमती मंजू खंधार |
| १६. धम्म साकेत (धम्म गृह) | श्री दीपक पगारे |
| १७. धम्म अनाकुल | श्री मोहनलाल अग्रवाल |
| १८. धम्म अजय | श्री बाबूराव शिंदे |
| १९. धम्म मल्ल | श्री नामदेव डोंगरे |
| २०. धम्म भूसन (धम्म गृह) | श्री प्रकाश महाजन |
| २१. धम्म वसुधा | श्रीमती निर्मला (मीरा) चिंचखेड़े |
| २२. धम्म छत्तपति | श्री भानुदास रसाल |
| २३. धम्म आवास | श्री महावीर एवं श्रीमती अंजना पाटील |
| २४. धम्म निरञ्जन | श्री चंद्रशेखर दहिवेले |
| २५. धम्म गोंड | श्री दिनेश देशमुख |

### उत्तर भारत

| | |
|---|---|
| १. धम्म थली | श्री विमलचंद सुराना एवं श्री शेरसिंह जैन |
| २. धम्म पुष्कर | श्रीमती सज्जनदेवी धारीवाल |
| ३. धम्म मरुधरा | श्री प्रभुदयाल सोनगरा |
| ४. धम्म पुब्बज | श्री सुरेश एवं श्रीमती रेणु खन्ना |
| ५. धम्म सोत | श्री मुरारीलाल शर्मा |
| ६. धम्म पट्ठान | कु. मनमोहिनी रस्तोगी |
| ७. धम्म कारुणिक | श्री रामनिवास गौतम |
| ८. धम्म सिखर | श्रीमती मंजू वैश |
| ९. धम्म लद्ध | श्री प्रमोदकुमार भावे |
| १०. धम्म सलिल | श्री अशोक कुमार नागपाल |
| ११. धम्म धज | श्री के. एल. शर्मा |
| १२. धम्म तिहाड़ | श्री प्रवीण भल्ला |
| १३. धम्म सुवत्थि | श्री गोपाल शरण एवं श्रीमती पुष्पा सिंह |
| १४. धम्म चक्क | श्रीमती बीना मेहरोत्रा |
| १५. धम्म लक्खण | श्री रुद्रदत्त तिवारी |
| १६. धम्म कल्याण | श्री प्रवीण भल्ला |

### गुजरात

| | |
|---|---|
| १. धम्म सिन्धु | डॉ. भीमसी एवं श्रीमती पुष्पा सावला |
| २. धम्म पीठ | श्री इंद्रवदन कोठड़िया |
| ३. धम्म कोट | श्री राजेश एवं श्रीमती मनीषा मेहता |
| ४. धम्म दिवाकर | श्री अनिल एवं श्रीमती सुनीता धर्मदर्शी |
| ५. धम्म भवन (धम्म गृह) | श्री रमणिकलाल एवं श्रीमती कंचन मेहता |
| ६. धम्म अम्बिका | श्री जयंतिलाल एवं श्रीमती कमला ठक्कर |

### मध्य व पूर्व भारत

| | |
|---|---|
| १. धम्म गङ्गा | श्री लक्ष्मीनारायण एवं श्रीमती पुष्पा तोदी |
| २. धम्म बङ्ग | श्री श्याम एवं श्रीमती कांता खद्दरिया |
| ३. धम्म उत्कल | श्री हरिलाल साहू |
| ४. धम्म कानन | श्री दिनेश मेश्राम |
| ५. धम्म पाल | श्री अशोक एवं श्रीमती उमा केला |
| ६. धम्म बल | श्रीमती प्रमिला शाह |
| ७. धम्म रत | श्री नारायण एवं श्रीमती शारदा वाधवानी |
| ८. धम्म मालवा | श्रीमती शीला केला |
| ९. धम्म केतु | श्री सुधाकर खैरे |
| १०. धम्म लिच्छवी | डॉ. ईश्वरचंद्र सिन्हा |
| ११. धम्म बोधि | श्री बिक्रम डांडिया |
| १२. धम्म उपवन (धम्म गृह) | श्री गोपाल एवं श्रीमती पुष्पा सिंह |
| १३. धम्म पुरी | श्री लक्ष्मीनारायण एवं श्रीमती पुष्पा तोदी |
| १४. धम्म सिक्किम | श्रीमती शीलादेवी चौरसिया |
| १५. धम्म पुब्बोत्तर | श्री मोहन दीवान |
| १६. धम्म भुबनेश्वर | श्री अनंत जेना |

### दक्षिण भारत

| | |
|---|---|
| १. धम्म खेत्त | श्री पिडुगु रविंद्र रेड्डी |
| २. धम्म सेतु | श्री वी. शांतनगोपालन |
| ३. धम्म पफुल्ल | श्रीमती जया संगोई |
| ४. धम्म निज्झान | श्री एस. एन. सहा |
| ५. धम्म विजय | श्री मोहन राज अडला |
| ६. धम्म नागाज्जुन | श्री मोहन राज अडला |
| ७. धम्म राम | श्री सत्यनारायण राजू |
| ८. धम्म कोण्डञ्ञ | श्रीमती सबरीना कटकम |
| ९. धम्म केतन | श्री सुधीर पई |
| १०. धम्म मधुरा | श्रीमती रेणुका मेहता |

---

## अन्य देशांची केंद्र व केंद्रीय आचार्यांची सूची

### उत्तर अमेरिका

| विपश्यना केंद्र | केंद्रीय आचार्य |
|---|---|
| १. धम्म धरा | श्री बैरी एवं श्रीमती केट लैपिंग |
| २. धम्म कुञ्ज | श्री रिक एवं श्रीमती गेअर क्रचर |
| ३. धम्म महावन | श्री जॉन एवं श्रीमती गेल बेरी |
| ४. धम्म सिरी | श्री थॉमस एवं श्रीमती टीना क्रिसमन |
| ५. धम्म मण्ड | श्री पार्कर एवं श्रीमती लौरा मिल्स |
| ६. धम्म पकास | श्री डेनिस एवं श्रीमती लुइ आस्टिन |
| ७. धम्म वड्ढन | श्री रॉय मेनेजेस एवं श्रीमती सुलेका पुसविला |
| ८. धम्म पताका | श्री ब्रूस एवं श्रीमती मौरीन स्टिवर्ट |

### कॅनडा

| | |
|---|---|
| १. धम्म सुत्तम | श्री एलेन एवं श्रीमती रसेल लेपाईं |
| २. धम्म तोरण | श्री बिल एवं श्रीमती वर्जीनिया हैमिल्टन |
| ३. धम्म सुरभि | श्री बॉब एवं श्रीमती जेनी जेफ्स |
| ४. धम्म मोदन | कु. इवी चौन्सी |
| ५. धम्म करुणा | (अभी अनिश्चित) |

### रशिया

| | |
|---|---|
| १. धम्म दुल्लभ | श्री जुर्गेन एवं श्रीमती एला मै स्टोवासर |

### दक्षिण अफ्रीका

| | |
|---|---|
| १. धम्म पताका | श्री महासुख एवं श्रीमती मंजु खंधार |

### यूरोप

| | |
|---|---|
| १. धम्म पधान, यू.के. | श्री जॉन एवं श्रीमती जोआना लक्सफोर्ड |

२. धम्म दीप, यू. के. — श्री कर्क एवं श्रीमती रिनेट ब्राउन
३. धम्म सुखकारी, यू. के. — कु. नीला हलाई
४. धम्म सुमेरु, स्विट्जरलैंड — श्री क्रिसचियन एवं श्रीमती रोसी हिल्ड
५. धम्म अटल, इटली — श्री सर्जिओ बोरसा
६. धम्म पज्जोत, बेल्जियम — श्री डिर्क ट्वैर्न एवं श्रीमती माइक द विल्ड
७. धम्म मही, फ्रांस — श्री स्टीव एवं श्रीमती आल्विन स्मिथ
८. धम्म निलय (धम्म गृह), फ्रांस — श्री स्टीव एवं श्रीमती आल्विन स्मिथ
९. धम्म द्वार, जर्मनी — कु. फ्लोह लेहमैन
१०. धम्म नेरु, स्पेन — श्री मार्टिन एवं श्रीमती डेनी स्टीफेन्स
११. धम्म सोभन, स्वीडेन — श्री कैनेथ ट्र्यूडसन
१२. धम्म पल्लव, पोलैंड — श्री क्लाउस एवं श्रीमती एडिथ नोथनेगेल

**नेपाळ**

१. धर्मशृंग — श्री रूप एवं श्रीमती बीना ज्योति
२. धम्म तराई — श्री उत्तमरत्न एवं श्रीमती ज्ञानु धाख्वा
३. धम्म जननी — श्री बोधिबज्र एवं श्रीमती नानी छोरी बज्राचार्य
४. धम्म बिराट — श्री भक्तप्रसाद पौडियाल
५. धम्म चितवन — श्री नारायण प्रसाद तिवारी
६. धम्म कित्ति — श्री आदिरत्न शाक्य
७. धम्म पोक्खर — श्री शील बहादुर बज्राचार्य
८. धम्म सुरक्खत्त — श्री पूरण प्रसाद ढकाल

**कम्बोडिया**

१. धम्म लट्ठिका — श्री फ्रेंकोइस काउच

**हॉगकॉग**

१. धम्म मुत्त — श्री ग्रेगरी एवं श्रीमती आइरीन वॉंग

**इंडोनेशिया**

१. धम्म जावा — श्री ज्योफरी व्हाइट

**ईराण**

१. धम्म ईरान — श्री दर्यूस नोजोहूर

**इस्त्राएल**

१. धम्म पमोद — श्री बिल हॉर्ट

**कोरिया**

१. धम्म कोरिया — श्री बिल एवं श्रीमती एन्न क्रिसिलियस

**जपान**

१. धम्म भानु — श्री डेरिक एवं श्रीमती यूकिको फिलिप्स
२. धम्म आदिच्च — श्री क्रिस एवं श्रीमती सचिको वीडन

**मलेशिया**

१. धम्म मलय — श्री डॉन एवं श्रीमती सैली मेक्डॉनाल्ड

**मंगोलिया**

१. धम्म महान — (अभी अनिश्चित)

**म्यंमा**

१. धम्म जोति — ऊ थांग पे एवं डॉ मिंट मिंट टिन
२. धम्म रतन — ऊ थिन त्वे
३. धम्म मण्डप — डॉ मि मि मियांग
४. धम्म मण्डल — ऊ म्या क्वा
५. धम्म मुकुट — डॉ, मौं मौं अइ एवं डॉ यि यि विंग
६. धम्म मनोरम — डॉ न्यो विन
७. धम्म महिमा — डॉ म्या ले खैं
८. धम्म मनोहर — ऊ टिन औं एवं डॉ खैं मिंट मैं
९. धम्म निधि — डॉ ये मा मा नैं
१०. धम्म ञाणधज — ऊ बा थान
११. धम्म लाभ — श्री परसुराम गौतम
१२. धम्म मग्ग — श्रीमती सुशीला गोयन्का (डॉ निनि श्वे)
१३. धम्म महापब्बत — ऊ की थेन एवं डॉ टिन टिन ये
१४. धम्म चेतियपट्ठार — (अभी अनिश्चित)
१५. धम्म मयूरदीप — डॉ. ऊ थेन ठुन
१६. धम्म पब्बत — डॉ. म्यो औं एवं डॉ खिन थान
१७. धम्म हितसुख गेह — ऊ सान ल्विन एवं डॉ टिन टिन नैं
१८. धम्म मित्तयान — ऊ मौं मौं सैं
१९. धम्म रक्खित — ऊ क्वा ठु एवं डॉ की की टुन
२०. धम्म विमुत्ति — ऊ को को

**फिलिपाईन्स**

१. धम्म फल — श्री क्लाउस एवं श्रीमती नाडिया हेल्विग

**श्रीलंका**

१. धम्म कूट — श्रीमती दमयंती रतवत्ते एवं कु. कोमी मेंडिस
२. धम्म सोभा — श्री टी. ए. पियसेना
३. धम्म अनुराधा — श्री डी. एच. हेनरी

**तैवान**

१. धम्म उदय — श्री जॉर्ज हैशियो
२. धम्म विकास — श्री पिं सां वांग

**थायलंड**

१. धम्म कमल — डॉ. (श्रीमती) विलाइवन सितासुवन
२. धम्म आभा — कु. जितिनुन ज्युचारोंस्कुल
३. धम्म सुवण्ण — श्री आम्नात आपिचाटवुलोप
४. धम्म कञ्चन — श्री विचित एवं श्रीमती पोम्फेन लीनतफों
५. धम्म धानी — श्रीमती लदाचेत सेइंगम
६. धम्म सीमन्त — श्री नीरंद एवं सुत्थी छायोडम
७. धम्म पोराणो — श्री जुइचेन लिमचित्ति
८. धम्म पुनेति — श्री इतिपोन एवं श्रीमती मोंटा टोंगिनेट
९. धम्म चन्दपभा — कु. पत्र पत्रबुत्र

**मेक्सिको एवं लैटिन अमेरिका**

१. धम्म मकरन्द — श्री जर्मन केनो एवं श्रीमती मार्था मोलिना
२. धम्म सन्ति — श्री आर्थर निकोल्स
३. धम्म वेणुवन — कु. मिरजैम बर्न्स
४. धम्म पसन्न — कु. मकरैना इन्फेंट
५. धम्म सुखदा — श्री पार्कर एवं श्रीमती लौरा मिल्स
६. धम्म सुरिय — श्री पार्कर एवं श्रीमती लौरा मिल्स
७. धम्म नन्दनवन — श्री आर्थर निकोल्स

**ऑस्ट्रेलिया**

१. धम्म भूमि — श्री पेट्रिक गिवेन विल्सन एवं श्रीमती जेनी मेक्लोड
२. धम्म पस्सद्धि — श्रीमती लैरेन डोनेमन
३. धम्म रस्मि — श्रीमती एनी डोनेमन
४. धम्म उज्जल — श्री माइकल एवं श्रीमती तरिस बरनेस
५. धम्म पभा — श्री अर्नस्ट एवं श्रीमती कैरेन आरनोल्ड
६. धम्म आलोक — श्री सियन सेल्किन
७. धम्म पदीप — श्री वोल्कर बोजमेन एवं श्रीमती डोरिस हरमैन

**न्यूजीलॅंड**

१. धम्म मेदिनी — श्री रॉस रैनॉल्ड्स

---

## विश्व-विपश्यना केंद्रांचे प्रादेशिक समन्वयक आचार्यांची सूची

**प्रदेश/देश** — **समन्वयक आचार्य/आचार्या**

**भारत**

- **जम्मू व काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तरांचल --** श्री प्रवीण भल्ला
- **उत्तर प्रदेश, झारखंड --** श्री प्रवीण भल्ला
- **बिहार --** श्री विमलचंद सुराना
- **मध्य प्रदेश --** श्री अशोक व श्रीमती उमा केला

- **छत्तीसगढ़ --** श्री सुधीर व श्रीमती माधुरी शाह
- **ओड़ीसा, वेस्ट बंगाल, आसाम, अरुणाचल, त्रिपुरा, मिजोरम --** श्री एल. एन. तोदी
- **सिक्किम, मेघालय,** नागालॅंड, **मणिपुर --** श्रीमती शीलादेवी चौरसिया
- **आंध्रप्रदेश, कर्नाटक -** श्री मोहनराज अडला एवं श्रीमती सबरीना कटकम
- तमिळनाडु -- श्री विमलचंद सुराना
- केरळ -- श्री सुधीर पई

**महाराष्ट्र (जनपदानुसार) --**

(१) विदर्भ (अकोला, यवतमाल, वर्धा, नागपुर, भंडारा, चंद्रपुर, गढ़चिरोली - श्री सुधीर व श्रीमती माधुरी शाह तथा श्री विश्वम्भर दहाट

(२) बुलढाणा, जालना, परभणी, बीड, नांदेड़, लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद - श्री चंपालाल खींवसरा

(३) सिंधुदुर्ग, कोल्हापुर, सांगली, सोलापुर, सतारा, रतनागिरी, गोवा - श्री प्रकाश व श्रीमती शुभांगी बोरसे

(४) धुळे, जळगांव, अहमदनगर, रायगड, पुणे डॉ. हमीर व डॉ. (श्रीमती) निर्मला गानला

(५) ठाणे, मुंबई, नाशिक - श्री महासुख व श्रीमती मंजू खंधार तथा श्री प्रेमजी व श्रीमती मधु सावला

- **राजस्थान --** श्री विमलचंद सुराना व श्री शेरसिंह जैन
- **गुजरात --**

(१) कच्छ - श्री भीमसी व श्रीमती पुष्पा सावला

(२) सौराष्ट्र - श्री राजेश व श्रीमती मनीषा मेहता

(३) अहमदाबाद व शेष उत्तरी गुजरात - श्री काश्यप व श्रीमती कमला धर्मदर्शी

(४) भड़ौंच व अहमदाबाद सोड्न मध्य गुजरात - श्री रमणिकलाल मेहता

(५) ऊमरगांव (वापी) ते भड़ौंच सहित दक्षिणी गुजरात - श्री जयंतीलाल व श्रीमती कमला ठक्कर

**इत्तर देशांची सूची**

**प्रदेश/देश** **समन्वयक आचार्य/आचार्या**

**अमेरिका -**

- **अमेरिका ९२ डिग्री अक्षांश पूर्व-** श्री बैरी व श्रीमती केट लैपिंग
- **शेष ठिकेतील राज्य** - श्री थॉमस व श्रीमती टीना क्रिसमन
- **मेक्सिको व लैटिन अमेरिका-** श्री आर्थर निकोलस व श्री पार्कर व श्रीमती लोरा मिल्स

**कॅनाडा -** श्री बिल व वर्जिनिया हैमिल्टन

**अफ्रीका -**

- **दक्षिणी अफ्रीका -** श्री महासुख व श्रीमती मंजू खंधार
- **मध्य व उत्तरी अफ्रीका-** श्री लेथ व श्रीमती मेलिनी वार्क
- **ऊपरी अफ्रीका -** श्री दर्यूस नोजोहूर
- **शेष अफ्रीका -** श्री डेनियल मेयर

**यूरोप --**

- **जर्मनी, इटली, स्वीडन और** रशिया **सहित पूर्वी देश -** कु. फ्लोह लेहमन
- **शेष यूरोप** श्री क्रिस व श्रीमती सचिको वीडन

**अशिया -**

- **नेपाळ -** श्री रूप व श्रीमती बीना ज्योति
- **कंबोडिया -** श्रीमती सुत्थी छायोडम व कु. जितिनुन ज्युचारोंस्कुल
- हॉंगकॉंग - श्री ग्रेगरी व श्रीमती आइरीन वांग
- **इंडोनेशिया -** श्री ज्योफ्री व्हाइट
- **ईराण -** श्री दर्यूस नोजोहूर
- **कोरिया -** श्री बिल व श्रीमती ऐन्न क्रिसिलियस
- **जपान -** श्री क्रिस व श्रीमती सचिको वीडन
- **मलेशिया, सिंगापुर, फिजी -** श्री डॉन व श्रीमती सैली मेक्डोनाल्ड
- **मंगोलिया -** (अभी अनिश्चित)
- **म्यंमा -** डॉ येमा मॉ नैं
- **श्रीलंका -** श्रीमती दमयंती रतवत्ते
- **तैवान -** श्री जॉर्ज हैशियो
- **थायलंड -** कु. जितिनुन ज्युचारोंस्कुल
- **यू. ए. ई., ओमान और बहरीन सहित-- खाड़ी (GCC)** तील **देश-** श्री रतिलाल व श्रीमती चंचल सावला
- इस्राएल - श्री बिल हॉर्ट
- **गणतांत्रिक चीन -** श्री फिलिक्स ली व श्रीमती यू येन और श्री जॉर्ज हेसियो
- **फिलीपाइन्स,** व्हिएतनाम - श्री क्लाउस व श्रीमती नाडिया हेल्विग

**ऑस्ट्रेलिया -** श्रीमती लैरेन डोनेमन

न्यूझीलॅंड - श्री रॉस रिनोल्डस

-----------

## केंद्रीय आचार्य/आचार्यांचे उत्तरदायित्वः

**१.** जरी केंद्राच्या साऱ्या प्रशासकिय कार्यांचे उत्तरदायित्व केंद्रीय आचार्य/आचार्याद्वारे नियुक्त ट्रस्टींचे राहील. तरीही केंद्रीय आचार्य/आचार्यांना हे सुनिश्चित करावे लागेल की प्रत्येक काम वेळेवर आणि निर्धारित दिशा निर्देशानुसारच (स्थानिक सरकारच्या नियमानुसार) व्हावे.

**२.** शिबिर/साधनेसंबंधी सर्व कार्यांचे उत्तरदायित्व केंद्रीय आचार्य/आचार्यांवर आहे. त्यांची इच्छा असेल तर ते स्थानिक सहायक आचार्य/आचार्या, वरीष्ठ सहायक आचार्य/आचार्या, पूर्ण आचार्य/आचार्या अथवा धर्म सेवकांची सहायता घेऊ शकतात.

**३.** धर्मसेवकांना प्रशिक्षित करणे केंद्रीय आचार्य/आचार्या यांचे उत्तरदायित्व आहे.

**४.** ही सुद्धा यांचीच जबाबदारी आहे की केंद्राचा त्रैमासिक अहवाल समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्या व विपश्यना विशोधन विन्यासला पाठवावा.

सर्व केंद्रीय आचार्यांनी ज्या स्वीकृती पत्रावर हस्ताक्षर केलेले आहेत त्यातच त्यांची अन्य कर्तव्येही परिभाषित आहेत. संक्षेपात, केंद्राच्या प्रती आपल्या जबाबदाऱ्यांना निभविणे व हे सुनिश्चित करणे की काम निर्धारित निर्देशानुसार होत आहे. ह्या कर्तव्यांना पूर्ण करण्यासाठी ते जेव्हा वाटेल तेव्हा आपल्या समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्या यांचा सल्ला घेऊ शकतात.

-----

## समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्यांचे उत्तरदायित्व :

**१.** आपल्या क्षेत्रात विपश्यनेचा विकास व प्रचार-प्रसार, अस्थायी शिबिरांचे आयोजन, लघू-आनापान शिबिरांचे आयोजन, भिन्न-भिन्न प्रकारच्या समूहांमध्ये व संस्थामध्ये विपश्यनेबाबत परिचय-सत्रांचे आयोजन करणे इत्यादी.

**२.** जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा आपल्या क्षेत्राच्या केंद्रीय आचार्य/आचार्यांना सहायता करणे.

**३.** आपल्या क्षेत्रात हे सुनिश्चित करणे की विपश्यना संबंधित

कार्य परम पूज्य गोयन्कांजीद्वारे दिलेल्या निर्देशानुसारच चालत आहेत.

**४.** आपल्या क्षेत्रात नव्या केंद्राच्या स्थापनेच्या विनंतीला तपासणे आणि जवळच्या केंद्रीय आचार्य/आचार्या अथवा अन्य पूर्ण आचार्य/आचार्यांशी विचार-विमर्श करून निर्णय करणे.

**५.** आपापल्या क्षेत्रात सहायक आचार्य/आचार्या, वरिष्ठ सहायक आचार्य/आचार्या व पूर्ण आचार्य/आचार्यांच्या समस्यांना सोडविणे.

**६.** आपापल्या क्षेत्रात सहायक आचार्यांच्या प्रशिक्षणाला सुनिश्चित करणे. प्रशिक्षणाची प्रणाली विश्वभरात सर्वांसाठी समान राहील. त्यामुळे सुनिश्चित करणे की आपल्या क्षेत्रातील सर्व सहायक आचार्य/आचार्या, वरिष्ठ सहायक आचार्य/आचार्या, पूर्ण आचार्य/आचार्या तीन वर्षात एकदा सहायक आचार्य/आचार्या कार्यशाळेत अवश्य उपस्थित राहतील.

**७.** स्थानिक भाषेत धर्म-साहित्याच्या अनुवादाचे उत्तरदायित्व त्यांचेच राहील.

**८.** आपल्या क्षेत्राच्या सहायक आचार्यांचे शिबिरात सेवा देण्याची समय-सूची तयार करण्याचे उत्तरदायित्व त्यांचेच राहील.

**९.** सर्व आचार्य/आचार्या एखाद्या योग्य साधकाचे नाव सहायक आचार्य/आचार्या बनविण्यासाठी ए.टी. किटच्या सुचनांनुसार शिफारस करू शकतात. ते आपली शिफारस समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्यांजवळ पाठवतील, ज्यावर समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्या तत्कालीन निर्देशानुसार पुढील कार्यवाही करतील.

**१०.** समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्या हे सुद्धा निश्चित करतील की आपल्या क्षेत्रात कोणत्या केंद्रात दीर्घ शिबिर आयोजित करावे.

**११.** ते विपश्यना विशोधन विन्यासला त्रैमासिक अहवाल पाठवतील.

संक्षेपाने, समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्यांचे हे उत्तरदायित्व असेल की हे सुनिश्चित करावे की जे मार्ग-निर्देशन निर्धारित केले गेले आहे त्याच्या अनुसारच त्यांच्या क्षेत्रात विपश्यनेचे कार्य सुरू आहे.

## अन्य मार्गनिर्देश

- "सयाजी ऊ बा खिनांच्या परंपरेत पूज्य गोयन्काजीं द्वारे प्रशिक्षित-" ह्या परंपरेत परम पूज्य गोयन्काजी प्रमुख आचार्य आहेत. त्यांच्या निर्देशांचे पालन आम्हाला दर वेळी करावे लागेल व वेळो-वेळी त्यांच्याद्वारे केल्या गेलेल्या परिवर्तनांनाही मानावे लागेल.
- परम पूज्य गोयन्काजींनी आपल्या बौद्धिक संपदेचे सर्वाधिकार विपश्यना विशोधन विन्यास, भारताला सोपविलेले आहेत. सर्व लेख व त्यांचे रेकार्डिंग्स ह्यात सामील आहेत. जे कोणी याचा उपयोग करू इच्छित असतील, ते विपश्यना विशोधन विन्यासाची पूर्वानुमती प्राप्त करूनच ह्याचा उपयोग करू शकतील.
- डिसेंबर २०१२ मध्ये रूपांतरित ए. टी. किटचेच सर्व पालन करतील.
- साऱ्या विश्वात सर्व प्रकारच्या प्रशिक्षणाचे मापदंड समानच राहतील.
- सर्व प्रकारच्या संगणना जसे सहायक आचार्य/आचार्यांची सूची, विश्वभरातील शिबिरांची सूची इत्यादीला विपश्यना विशोधन विन्यास द्वारेच अंतिम रूप दिले जाईल.
- सहायक आचार्यांचे विश्वस्तरीय वार्षिक संम्मेलन धम्मगिरी अथवा धम्मपत्तन येथे व्हावे जेणेकरून त्यात सर्व भाग घेऊ शकतील. जर प्रत्येक वर्षी सहभागी होता आले नाही, तर कमीत कमी तीन वर्षात एकदा अवश्य सहभागी व्हावे, हे अपेक्षित आहे.
- ह्याव्यतिरिक्त सहायक आचार्यांच्या संम्मेलनाचे विवरण जरी ते क्षेत्रीय स्तरावरच आयोजत केले गेले असले तरीही त्याचे निष्कर्षांना विश्वाच्या सर्व पूर्ण आचार्यांना कळविण्यात यावे.
- टेप वाटपाची प्रक्रिया सध्या जशी आहे तशीच राहील.

### परम पूज्य गोयन्काजींच्या अनुपस्थित :

- प्रशिक्षण सामग्रीत कोणतेही परिवर्तन होणार नाही.
- ए.टी. किट वा प्रशिक्षण सामग्रीत परिवर्तनाची आवश्यकता पडली तर विश्वभरातील समन्वयक क्षेत्रीय आचार्यांच्या सल्ल्याने करावे. जर ७५% आचार्यांचे समान विचार असतील तरच परिवर्तन करण्यात यावे. (ह्या प्रक्रियेचे समन्वयन विपश्यना विशोधन विन्यास करेल).
- केंद्रीय आचार्य/आचार्यांच्या अचानक असलेल्या अनुपस्थितित समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्या, जवळील केंद्रीय व त्या क्षेत्राच्या अन्य पूर्ण आचार्य/आचार्यांसोबत सल्ला मसलत करून नवीन नियुक्ती करतील.
- समन्वयक क्षेत्रीय आचार्य/आचार्यांच्या अचानक असलेल्या अनुपस्थितित त्या क्षेत्रातील पूर्ण आचार्य/आचार्या व वरिष्ठ सहायक आचार्य/आचार्या (७५% समान विचारांनी) नवीन नियुक्ती करतील.

---

## पूज्य गुरुदेवांचे स्वास्थ्य व सक्रियता

पूज्य गुरुदेवांच्या स्वास्थ्यात चांगली सुधारणा आहे. परंतु त्यापेक्षा अनेक पट आवश्यक अर्धवट कामे पूर्ण करावयाची आहेत. साधकांच्या मंगल कामना मदत करीतच आहेत. १८ नोव्हेंबरपासून ३ डिसेंबरपर्यतचे त्यांचे स्वयं-शिबिर अत्यंत बलदायक सिद्ध झाले. मैत्रीच्या वेळी त्यांनी जे उद्‌गार व्यक्त केले ते खूपच प्रेरणादायक आहेत –

"माझ्या प्रिय धर्मपुत्रांनो-धर्मपुत्रिंनो!

शिबिराची मंगल मैत्री तर आत्ता ऐकलीच. ह्याव्यतिरिक्त मी काय सांगू? एक विशेष बाब जी लक्षात येते ती ही आहे की जर एखाद्या नासमज व्यक्तीने तुमच्यासोबत दुर्व्यवहार केला असेल आणि तुम्ही बदल्यात मुळीच दुर्व्यवहार केला नाही तर हे फार छान झाले. दुर्व्यवहार तर नाही केला परंतु मनात त्या व्यक्तीच्या प्रती दुर्भावना जागविली हे वाईट झाले. त्याच्या प्रती मनात जी दुर्भावना जागविली, ही खूपच वाईट गोष्ट झाली. समजले पाहिजे की दुर्भावना जरी मनातल्या मनात जागविली परंतु त्यामुळे त्याला ठेच पोहोचली. ह्यामुळे प्रथम त्याला क्षमायाचना करावी. भाऊ! ह्या प्रकारे मी तुला जे दु:ख पोहचविले, त्याबाबत क्षमायाचना करतो. दुसरी बाब त्यापेक्षा महत्वपूर्ण की त्याच्याप्रती जी दुर्भावना जागविली होती. त्यापेक्षा अनेक पट अधिक आता त्याच्या प्रती सद्‌भावना जागवू. अनेक पट अधिक सद्‌भावना जागवावी, प्रेम जागवावे. मैत्री जागवावी, करुणा जागवावी. तेव्हाच आम्ही विपश्यनेच्या लायक झालो आणि खऱ्या अर्थाने मैत्रीच्या लायक झालो. असा मैत्रीभाव खूप वाढवावा, मैत्रीचे जीवन जगावे. मैत्रीला जीवनात उतरवावे.

सर्वांचे मंगल होवो! सर्वांचे कल्याण होवो!! सर्वांची स्वस्ति-मुक्ती होवो!!!...."

शिबिरानंतर ५ डिसेंबरला बाबासाहेब डॉ भीमराव आंबेडकरांच्या पुण्यतिथीनिमित्त मुंबईतील चैत्य-भूमी व शिवाजी मैदानात आयोजित एका मोठ्या समारोहात पूज्य गुरुजींना आमंत्रित केले गेले होते. हजारोंच्या संख्येने उपस्थित होऊन लोकांनी भगवान बुद्ध व बाबासाहेबांच्या प्रती आपली श्रद्धांजली अर्पित केली. इतके वाढलेले वय व दुर्बळ स्वास्थ्य असतांनाही श्रद्धार्थांवर अनुकंपा करीत त्यांनी ३-४ तासाची यात्रा केली आणि हजारो लोकांना संबोधित केले. जवळपास अर्धा तासापर्यंत प्रवचन व मंगल मैत्री देऊन लोकांना उपकृत केले.

ह्यानंतर ६ डिसेंबरला आचार्यांच्या आंतरराष्ट्रीय संमेलनात भाग घेण्यासाठी इगतपुरीला गेले दि. ७ ते दि. ९ पर्यंत तेथे संमेलनाच्या सफलतेसाठी आवश्यक निर्देश दिले. त्यांची मंगल मैत्री आणि पूज्य गुरुजी व माताजींचे सान्निध्य प्राप्त करून सर्व साधक आणि आचार्यगण प्रसन्न झाले. संमेलन खूपच सफलतापूर्वक संपन्न झाले. संमेलनापूर्वी विपश्यनेच्या सफल संचालन आणि भविष्यात दीर्घकाळापर्यंत शासनाच्या अभिवृद्धीसाठी ह्याच्या संगठनात्मक चौकटीला सुदृढ करण्याचे काम केले. (जे ह्याच अंकात प्रकाशित आहे.) ह्यानंतर आता ते आपल्या पारिवारिक समारोहात भाग घेण्यासाठी व आपल्या जन्मभूमीच्या आणि धर्मभूमीच्या प्रती श्रद्धांजली प्रकट करण्यासाठी म्यंमाला जात आहेत. तेथील साधकांना आणि विद्वान भिक्षूंना भेटून त्यांना खूप प्रसन्नता वाटते आणि खूप धर्मबळ मिळते. म्हणून इतके कष्ट घेऊनही दहा दिवसांपर्यंत 'चरथ भिक्खवे चारिकं' ला चरितार्थ करण्यासाठी ही यात्रा करीत आहेत. तेथे त्यांची काही सार्वजनिक प्रवचने होतील आणि पवित्र श्वेडगोन पगोडा परिसरात सामूहिक साधना होतील. त्यासाठी दि. २१ च्या सकाळी ८ वाजता मुंबईवरून प्रस्थान करून विशेष विमानाने सरळ रंगूनला जातील आणि दि. ३० च्या सायंकाळी ४ वाजता तेथून मुंबईसाठी रवाना होतील.

बहुजन हिताय बहुजन सुखाय त्यांच्या यात्रेच्या सफलतेसाठी आणि सुखद स्वास्थ्यासाठी आम्ही सर्वांच्या मंगल कामना!

सर्वांचे मंगल होवो!

## ग्लोबल पगोडात पालि अभ्यासक्रम - २०१३

**विपश्यना विशोधन विन्यास, ग्लोबल पगोडात अनिवासीय अभ्यासक्रम पालि व्याकरण, सुत्त, सैद्धांतिक विपश्यना इत्यादी. शिक्षणाचे माध्यम -** पालि-इंग्रजी, पालि-मराठी, पालि-हिंदी, **अवधी** ०१-०२-२०१३ ते ३०-९-२०१३ पर्यंत (८ महिने, आठवड्यात एकदा, ११ ते ५ वाजेपर्यंत); **आवेदन पत्र प्राप्त करण्याचे स्थान व तिथी -** वी. आर. आय., ग्लोबल पगोडा, १ ते १५ जानेवारी २०१३ पर्यंत; आवेदन पत्र जमा करण्याची अंतिम तारीख - २०-१-२०१३

**निवासीय अभ्यासक्रम (परियत्ती आणि पटिपत्ती):-**

**३० दिवसीय प्रारंभिक पालि-मराठीः अवधि -** ०१-०१-२०१३ ते ३१-०१-२०१३ पर्यंत; **फार्म जमा करण्याची अंतिम तिथि -** ०१-१२-२०१२;

**३० दिवसीय उच्चत्तर पालि-हिंदी** (वी.आर.आय. इगतपुरीतून प्रारंभिक पालि-हिंदी अभ्यासक्रम **केलेल्या विद्यार्थ्यांसाठी) अवधी -** ०१-०५-२०१३ ते३१-५-२०१३ पर्यंत **आवेदन पत्र जमा करण्याची अंतिम तारीख -** ०१-०४-२०१३;

**९० दिवसीय अभ्यासक्रम; पालि-इंग्रजी; अवधी -** ०१-०७-२०१३ ते ३०-०९-२०१३ पर्यंत; आवेदन पत्र जमा करण्याची अंतिम तारीख - १५-०५-२०१३; **सर्वांसाठी कंप्यूटर वर आवेदन पत्र –** www.vridhamma.org ने ही पाठवू शकतात. **संपर्कः** विपश्यना विशोधन विन्यास (V. R. I.), ग्लोबल विपश्यना पगोडा, एस्सेल वल्डच्या जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१.

**अधिक माहितीसाठी संपर्क करा –** डॉ शारदा संघवी – फोनः (०२२-२३०९५४१३) ०९२२३४६२८०५, **ईमेलः s_sanghvi@hotmail.com;** २) श्रीमती बलजीत लाम्बाः फोनः ०९८३३५१८९७९; ३) अलका वेंगुर्लेकरः मोबाईल – ०९८२०५८३४४०.

---

## ग्लोबल विपश्यना पगोडासाठी कॉर्पस फंड

ग्लोबल पगोडाच्या निर्बाध संचालनासाठी एक कॉर्पस फंड एकत्र केला जात आहे, ज्यामुळे भविष्यात ह्याचा सांभाळ कोणत्याही बाहेरील दबावाविना सफलतापूर्वक होत राहील आणि म्यंमामध्ये सद्धर्माला सुरक्षित ठेवणे तसेच भारतात परत पाठविणे याबद्दल सयाजी ऊ बा खिन व म्यंमाच्या प्रती कृतज्ञता ज्ञापनाचे हे अद्भुत पावन प्रतीक हजारो वर्षांपर्यंत कायम राहील. ह्या कॉर्पस फंडाचा उपयोग कोणतीही व्यक्ती आपल्या व्यक्तिगत लाभासाठी करू शकत नाही, तर सरकारी बँकेत जमा ह्या धनाच्या व्याजाने पगोडाचा दैनिक खर्च व सांभाळासंबंधी कामे पगोडा-संरक्षणाच्या नियमानुसार होत राहतील.

**कार्पस फंड दान पाठविण्यासाठी विवरण ह्या प्रकारे आहे –**

१. भारतात कोर बँकिंगव्दारे ग्लोबल विपश्यना फाउंडेशनला दान पाठविण्यासाठी भारताच्या कोणत्याही बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून पैसे पाठवू शकतात. विवरण खालील प्रमाणे आहे–

**"Global Vipassana Foundation"**
**'Axis Bank India'**, A/C. NO: 911010032397802
SWIFT CODE: AXISINBB062,
IFSC CODE: UTIB0000062
MICR CODE: 400211011,
BRANCH: Malad west branch, Mumbai-400064.

**२.** भारताच्या बाहेरून दान पाठविण्यांसाठी विवरण खालील प्रमाणे आहे– **( SWIFT transfer to 'Bank of India')**
**"Global Vipassana Foundation"**
Name of the Bank : **"J P Morgan Chase Bank"**
Address : New York, US,
A/c. No. : 0011407376, Swift: CHASUS33.

### चेक/ड्राफ्ट कृपया खालील पत्त्यावर पाठवावेत –

ग्लोबल विपश्यना फाउंडेशन रजि. ऑफिस-ग्रीन हाउस, २ रा माळा, ग्रीन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४०००२३, फोनः **०२२-२२६६५९२६.**

### सयाजी ऊ बा खिनांच्या पुण्यतिथीनिमित्त पूज्य गुरुदेवांच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

**२० जानेवारी**, २०१३, **रविवार, वेळः** सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पगोडा' च्या** मोठ्या धम्मकक्षा (डोम) मध्ये. कृपया लक्ष द्यावे की ह्या विशाल शिबिरात आपल्याला कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये यासाठी **बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्कः मो.** ०९८९२८५५६९२, ०९८९२८५५९४५ **फोन नं.:** ०२२-२८४५११७०, ३३७४७५४३, ३३७४७५४४, (**फोन बुकिंगः** सकाळी ११ ते ५ पर्यंत, रोज) **ईमेल Registration:** oneday@globalpagoda.org;
**Online Registration:** www.vridhamma.org

**नये उत्तरदायित्त्व**

**वरिष्ठ सहायक आचार्य**

१. श्रीमती शारदा जैन, बंगलुरु
२. श्री मनोहर मिर्जे, कोल्हापुर
३. श्री सुवर्ण बरड़िया, कोल्हापुर
४. श्रीमती सुनंदा मानधना, कोल्हापुर
5. Mr. Michael Gelber, Canada
6-7. Mr. Stephen Hanlon & Mrs. Rebecca York-Hanlon, USA
8. Mr. Craig Archambault, USA

**नव नियुक्तीयां**

**सहायक आचार्य**

१. श्री सुनीलसिंह बायस, पारली
२. श्री विनोद पारख, फरीदाबाद
३. श्री राजाभाऊ राउत, वासिम
४. श्री बालकृष्ण गजभिये, नवी मुंबई
५. श्री सुभाष मुंदाड़े, अमलनेर
6. Mrs. Hirani Indra Malagala, Sri Lanka
7. Mrs. Kian Ber Chiam, Singapore

**बाल-शिबिर शिक्षक**

१. श्री वाडला कृष्णमूर्ति, हैदराबाद
२. श्री वी. तिरुपति रेड्डी, हैदराबाद
३. श्री बीरम वंमसी मोहन, हैदराबाद
४. श्री बालकृष्ण मेकाला, हैदराबाद
५. श्री वेमुला श्रीनिवास, सिकंदराबाद
६. श्री ए. शंकर, निजामाबाद, आंध्रप्रदेश
७. श्री इंदुर राजा रत्नम, निजामाबाद, आ.प्र.
८. श्री बी. अणजी रेड्डी रंगा रेड्डी
९. श्री सेडेन्की रेड्डी रंगा रेड्डी
१०.श्री शिवचरण सिंह, नलगोंडा, आ. प्र.
११. श्री करुमुला श्रीनिवास रेड्डी, नलगोंडा, आ. प्र.
१२. श्री पूंडरू नारसा रेड्डी, आदिलाबाद, आ. प्र.
१३. श्री नूतन कलमकर, वर्धा
१४. श्रीमती पुष्पा जुंघारे, चंद्रपुर
१५. श्री वांगनू डांगे, चंद्रपुर
१६. कु. श्वेता रामटेक, नागपुर
१७. श्री नीलेश आटे, नागपुर
१८. श्री शेषराव सिरसाट, अमरावती
१९. श्री दिनकर हेलोन्डे, बुलढाणा
२०. श्री धम्मदीप वानखेड़े, अकोला
२१. श्री अनिलकुमार बन्सोड, तकटघाट
२२. श्री पुरुषोत्तम दुधे, गडचिरोली
२३. श्री विजय हेडाऊ, गडचिरोली
२४. कु. पदमा धोंगड़े, गडचिरोली
२५-२६. श्री अनल और श्रीमती रजनी लॉरेंस, भटिंडा
27. Mr Jim Rees, Australia
28. Ms NG Shirley, Hong Kong
29. Mr.Tyler McGrath, Washington, USA
30. Mr.Josh McEwen, Washington, USA
31. Mr Billy Simmons, Washington, USA
32. Ms.Chaya Kudla, Washington, USA
33. Mrs.Shashi Sheth, Washington, USA
34. Mrs.Shubhra Jain,California, USA
35. Ms.Elizabeth Lily Barry, California, USA
36-37. Mr.Srinivas Srinkanth & Mrs.Preethi Srinkanth,Texas, USA
38. Mr.Thomas Edward Allen,Illinois, USA
39. Ms.Naomi Jonas, Ontario, Canada

## दोहे धर्माचे

मार्ग दाखविला बुद्धाने, चालणे आपले काम।
चालता चालता आपोआप, मिटती दुःख तमाम॥
चल साधक चालत राहू, देश आणि परदेश।
धर्म चारिकेने संपती, सर्वांच्या मनाचे क्लेश॥
जीवनात जागे धर्म, पुलकित हो तन मन।
आपलेही मंगल साधे, मंगल हो जन जन॥
ज्या पथावर चालता, शुद्ध होत जाते मन।
तो पथच कल्याण पथ, धर्म पथ म्हणती जन॥

## दोहे धर्माचे

चल साधक चालत राहू, जन सेवेचे काम।
आता काय विश्राम आहे, आता काय आराम॥
जन जनांची सेवा करू, हेच जीवनाचे ध्येय राहे।
हेच माझ्यासाठी कल्याणकारी, हेच मला प्रिय आहे॥
चल भिक्षू चालत राहू, आता कोठे विश्राम।
बहुजन हितसुखासाठी, त्याज्य आहे आराम॥
आठ अंगाचा धर्म पथ, दिला बुद्ध भगवान।
चालत चालत आपोआप, पावू पद निर्वाण॥
स्वदर्शनाचा पंथ मिळाला, मंगल जागले अनंत।
तुटले बंधन दुःखाचे, चालत चालत पंथ॥

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org